# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील तालुका कृषी कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी व राज्यातील प्रमुख पाच संघटनांनी विविध मागण्यासाठी केलेले आंदोलन**

**(१) २३४ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तालुका कृषी कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी राज्यातील प्रमुख पाच संघटनांनी विविध मागण्यासाठी पोलादपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरण आंदोलन सुरु केले असून आमरण उपोषण करण्याचा इशाराही माहे ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांच्या मागण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य कृषि सेवा महासंघ, पुणे (शाखा रायगड) यांनी त्यांचे निवेदनात नमुद केलेल्या काही मागण्यांबाबत निर्णय घेण्याबाबतची बाब न्यायप्रविष्ठ आहे. काही सेवाविषयक व आर्थिक भारासंबंधीच्या मागण्या अमान्य करण्यात आल्या असुन उर्वरित धोरणात्मक स्वरुपाच्या मागण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई जव्हेरी बाजार येथे झालेल्या बॉम्बस्फोटातील कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२) ६५० (१५-०१-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जव्हेरी बाजार येथे दि. १३ जुलै, २०१४ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटातील चार बळीच्या कुटुंबांना अद्याप नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बॉम्बस्फोटातील कुटुंबियांना तातडीने मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-२-२०१५) :**(१) सदर बॉम्बस्फोटात मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सतत कोसळणा-या दरडीमुळे होत असलेले मृत्यू

**(३) ९१२ (२३-१२-२०१४). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सतत कोसळणा-या दरडीमुळे होत असलेले मृत्यू टाळण्यासाठी दरडीच्या खाली राहणा-या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०२-२०१५) :**(१) होय.

(२) माहिती संकलीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यासह विदर्भातील कृषी हवामान संशोधन केंद्राचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४) ११८६ (२२-१२-२०१४). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह विदर्भातील विद्यार्थ्यांना कृषी हवामान क्षेत्रात संशोधन करता यावे याकरिता कृषी विद्यापीठाकडून पाठविलेला कृषी हवामान संशोधन केंद्राचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कृषी विद्यापीठे अस्तित्वात असतांना या विद्यापीठांतर्गत मात्र स्वतंत्र संशोधन केंद्र नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात हवामान बदल तीव्र होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्रातील शेतीला या संकटातून बाहेर काढता यावे याकरिता इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे तरीही शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) राज्यात कृषि विद्यापीठांतर्गत स्वतंत्र कृषि हवामान संशोधन केंद्र अस्तित्वात नसले तरी कृषि विद्यापीठांतर्गत दापोली, परभणी व अकोला येथे अखिल भारतीय समन्वित कृषि हवामान संशोधन प्रकल्प कार्यरत आहेत. त्याद्वारे कृषि हवामानातील विविधता विषयक विश्लेषण व पीक उत्पादनावर होणारा परिणाम अभ्यासला जात आहे. तसेच पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव व प्रसार यावर हवामानाचा परिणाम अभ्यासण्याच्या दृष्टीने संशोधनात्मक कार्यक्रम राबविले जात आहेत.
(३) त्यासाठी प्रत्येक महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र स्थापित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.
(४) राज्यात कृषि विद्यापीठांतर्गत कृषि हवामान संशोधन केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता विचारात घेऊन त्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना कृषि विद्यापीठांना व महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेला देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उत्तर महाराष्ट्रासह विदर्भ तसेच अन्य भागात कापूस हे प्रमुख पीक असून या पीकाला कमी भाव मिळत असल्याबाबत

**(५) १२३३ (२२-१२-२०१४). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उत्तर महाराष्ट्रासह विदर्भ तसेच अन्य भागात कापूस हे प्रमुख पीक असून या पीकाला मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष दिसून येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कापूस पीकाला उत्पादन खर्च हा एकरी २० ते २५ हजारांपेक्षा अधिक असताना शासनाने जाहीर केलेल्या दरात तो शेतकऱ्यांना परवडणारा नाही त्यासाठी शासनाने हमी भाव वाढवून देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१५)** :(१) केंद्र शासनाने सन २०१३-१४ च्या खरीप विक्री हंगामाकरिता कापूस (लांब धागा) या पिकासाठी प्रति क्विंटल रु. ४०००/- तर, खरीप विक्री हंगाम २०१४-१५ करिता रु.४०५०/- इतकी किमान आधारभूत किंमत जाहीर केलेली आहे. मगील खरीप हंगामापेक्षा जालू खरीप हंगामासाठी जाहीर केलेला हमीभाव रु.५०/- ने जास्तीचा आहे.

(२) कापूस पीकाचा उत्पादन खर्च विचारात घेऊनच राज्य शासनाने खरीप विक्री हंगाम सन २०१३-१४ करिता रु.६०६८/- तर खरीप विक्री हंगाम २०१४-१५ करिता रु.६५०५/- इतक्या किमान हमी भाव रकमेची शिफारस केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोगाला केलेली होती. तथापि केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर विविध बाबी विचारात घेऊन उक्तप्रमाणे हमीभाव किंमती जाहीर केलेल्या आहेत. किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही, केंद्रशासनाच्या अखत्यारितील बाब आहे.

किमान आधारभूत किंमती निश्चित करताना महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती व इतर बाबींचा विचार करता राज्य शासनाने शिफारस केलेल्या किंमती विचारात घेण्यात याव्यात, याबाबत राज्य शासनाकडून केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोगाकडे नेहमीच आग्रही भूमिका घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा तालुक्यातील (जि. जळगांव) अडावद व गोरगांवले सर्कल आणि यावल तालुक्यातील यावल सर्कल येथील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(६) १३३५ (२३-१२-२०१४). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा तालुक्यातील (जि.जळगांव) अडावद व गोरगांवले सर्कल आणि यावल तालुक्यातील यावल सर्कल येथील शेतक-यांना माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास चक्रीवादळ / अतिवृष्टीमुळे शेतक-यांच्या केळी बागांचे झालेल्या नुकसानीची सदोष हवामान यंत्रामुळे नुकसान भरपाई मिळू शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हयाबाबत हवामान यंत्र कोठे व किती बसवावे याबाबत शासनाने पिक विमा कंपन्यांना काही मार्गदर्शक तत्वे घालून दिले आहे काय,

(३) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून उपरोक्त सर्कल मधील शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०३-२०१५)** :(१) हे, खरे नाही.

शासन निर्णय दि.१० सप्टेंबर, २०१४ मधील तरतूदीनुसार केळी या पिकास कमी तापमान, वेगाचे वारे व जास्त तापमान या हवामान धोक्यामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानभरपाई अनुज्ञेय आहे. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये केळी या पिकास चक्रिवादळ/अतिवृष्टी इ.बाबींचा धोक्यांचा समावेश विमा संरक्षणात नाही.

(२) होय, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार महसूल मंडळ निहाय स्वंयसचलीत हवामान केंद्र त्रयस्थ संस्थेमार्फत उभारण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी सेवकांच्या अनुपस्थितीतमुळे कोकणातील शेतक-यांचे होत असलेले नुकसान**

**(७) १८२१ (२२-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी सक्षम व्हावा तसेच आधुनिक शेतीतंत्राचा त्यांने वापर करावा या करिता शासनाने जिल्हा परिषदेमार्फत अनेक योजना शेतक-यांसाठी उपलब्ध केल्या आहेत तसेच या योजना शेतक-यांपर्यत पोहचविण्यासाठी कृषि सेवकांची नियुक्तीदेखील करण्यात आली परंतू कोकण विभागात या कृषिसेवकांचे अनुपस्थितीमुळे अनेक शासकिय योजना शेतक-यापर्यत पोहचत नाहीत तसेच या योजनाकरिता जिल्हापरिषदेकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला निधीचा विनियोगही होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कृषी सेवकांच्या अनुपस्थितीतमुळे कोकणातील शेतक-यांचे होत असलेले नुकसान रोखण्याकरिता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही. जिल्हा परिषदेच्या योजना कृषि विभागाकडून राबविल्या जात नाहीत अथवा त्याकरीता जिल्हा परिषदेकडून कृषि सेवकांच्या नियुक्त्याही केल्या जात नाहीत. तसेच याकरीता जिल्हा परिषदेकडून अनुदान उपलब्ध करुन दिले जात नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील होतकरु उच्च शिक्षण घेण्याकरिता इच्छुक मुला-मुलींची आर्थिक दुर्बलतेमुळे परराष्ट्रात शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकत नसल्याबाबत**

**(८) १८४२ (२२-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील होतकरु उच्च शिक्षण घेण्याकरिता इच्छुक मुला-मुलींची आर्थिक दुर्बलतेमुळे परराष्ट्रात शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकत नसल्याचे माहे नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उच्च शिक्षण घेण्याकरीता इच्छुक मुला-मुलींना आर्थिक मदत देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०१-२०१५) :**(१) नाही. हे खरे नाही.

(२) सदरहू विषयाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांच्या विकासासाठी विकास आराखडा करण्याबाबत**

**(९) १९३९ (२२-१२-२०१४). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांच्या विकासासाठी विकास आराखडा करण्याचा निर्णय शासनाने माहे जुलै, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर विकास आराखड्यानुसार भूम व उस्मानाबाद तालुक्यांचा समावेश केलेला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०१-२०१५) :**(१) व (२) होय. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा (जिल्ह्यांतर्गत तालुक्यांच्या समावेशासह) सर्वंकष कृषि विकास आराखडा तयार करण्यात येत आहे.

(३) कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांसाठी स्कूल बस नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत**

**(१०) २०८८ (२२-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांसाठी स्कूल बस नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याच्या सूचना शासनाने राज्यातील सर्व परिवहन अधिका-यांना दिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी न करता सर्रास अवैध वाहनाने विद्यार्थी वाहतूक सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) याबाबत अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०२-२०१५) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस करिता विनिमय) नियम, २०११ चा भंग करुन विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खाजगी व इतर वाहनांच्या विरोधात कारवाई करण्यात येते.

सन २०१३-१४ मध्ये एकूण ६४१३ स्कूलबस व विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी इतर ९५३० अवैध वाहने तपासण्यात आली. त्यामध्ये २२३१ स्कुल बस व २१२९ विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी इतर अवैध वाहने दोषी आढळून आली ९३८ वाहने अटकावून ठेवण्यात येऊन रुपये ६९०९४३७/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

एप्रिल ते नोव्हेंबर २०१४ मध्ये एकूण ५०१४ स्कूलबस व विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी इतर ६७३९ अवैध वाहने तपासण्यात आली. त्यामध्ये ११२१ स्कूल बस व १२०६ विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी इतर अवैध वाहने आढळून आली. ४३२ वाहने अटकावून ठेवण्यात येऊन रुपये ४९७७३०२/- इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

(३) वरील कार्यवाही व्यतिरिक्त, केवळ शालेय मुलींची वाहतूक करणाऱ्या स्कूल बस मध्ये मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महिला सहवर्ती आवश्यक असण्याबाबतची तरतूद स्कूल बस नियमावलीमध्ये करण्यात आली आहे. विविध प्रसार माध्यमांद्वारे स्कूल बस नियमावलीस व्यापक प्रसिध्दी देण्यात आली आहे. राज्यात एकूण १९५२७ स्कूल बस सुरक्षितता समित्यांची स्थापन करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत शासन निर्णय दि. १४.९.२०११ व दि. २६.६.२०१२ नुसार शाळा प्रशासनांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. स्कूल बस वाहन चालक व सहवर्ती यांच्यासाठी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्याबाबत**

**(११) २२१० (२२-१२-२०१४). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्याची मागणी अल्पसख्यांक समाजातील लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक, धार्मिक संघटनाचे पदाधिकारी, जागरुक नागरिकांनी मा. मंत्री (अल्पसंख्याक विकास / औकाफ), मा. राज्यमंत्री (अल्पसख्यांक विकास / औकाफ), मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (औकाफ) यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१४ वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनातर्फे आजवर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली व कर्तव्यात कुचराई करणा-या अधिका-यांवर कोणती अशासकिय व दंडात्मक कारवाई करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०१-२०१५) :**(१) होय.

(२) राज्यातील वक्फ जमीनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ५४ नुसार कारवाई करण्याबाबत वक्फ मंडळाला वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वक्फ बोर्डाच्या लीजवर देण्यात आलेल्या जमिनीसाठी कायद्यामध्ये काही बदल करण्याबाबत**

**(१२) २२२८ (२२-१२-२०१४). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाच्या लीजवर देण्यात आलेल्या जमिनी यापुढे त्याच व्यक्ती किंवा संस्था यांना नुतनीकरण न देता लिलावाच्या माध्यमातून त्यांचे नुतनीकरण करून देण्यासाठी कायद्यामध्ये काही बदल करण्यात येईल अशी घोषणा अल्पसंख्यांक खात्याचे मंत्री यांनी नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने या बाबतीत काही धोरणात्मक पाऊले उचलली आहे काय,

(३) आल्यास, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०१-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषि आयुक्तांनी बी-बीयाणेंवर ॲडव्हान्स बुकींग होणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१३) २३१७ (२२-१२-२०१४). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने बी बियाणे निर्मिती करणा-या कंपन्यांवर बुकींग करणेस बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ -१५ करीता काही कंपन्यांची व्यापा-यांकडून ॲडव्हान्स बुकींग करुन घेतली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील काळात कृषि आयुक्तांनी ॲडव्हान्स बुकींग होणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापी या कंपन्यांवर कोणती ही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा प्रकारे कारवाई न करणा-या अधिका-यांवर व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ मध्ये ॲडव्हान्स बुकींग झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) ॲडव्हान्स बुकींग झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वल्फ बोर्डा संदर्भातील श्री.ए.टी.ए.के शेख**
**चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(१४) २३८२ (२२-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वल्फ बोर्डा संदर्भातील श्री.ए.टी.ए.के शेख चौकशी आयोगाने सादर केला अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचा कृती अहवाल तयार करण्यासाठी शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तर सचिव समितीची नियुक्ती करण्यात आली असून सदर समितीने काम पूर्ण केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर समितीच्या अहवाल त्वरीत सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१५) :**(१) होय.

(२), (३) व (४) सदर अहवाल विस्तृत स्वरुपातील असून अनेक विभागांशी संबंधित असल्यामुळे कृती अहवाल तयार करण्यास अवधी लागत आहे.

---

**शेमलाई, (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील चारही धरणांमधून पाणी सोडल्यावर**
**शेमलाई गाव पुराच्या पाण्याने वेढून जात असल्याबाबत.**

**(१५) २५९१ (२४-१२-२०१४). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेमलाई (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील चारही धरणांमधून पाणी सोडल्यावर बेंबळा नदीला महापूर येतो, त्यामुळे शेमलाई गाव पुराच्या पाण्याने वेढून जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गावक-यांचे जीव नेहमीच धोक्यात असते, म्हणून या गावांचे पुनर्वसनाचा प्रश्न बरेच दिवसांपासून शासन दरबारी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) असल्यास, तातडीने या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत शासन काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) नाही.

बेंबळा नदीत व स्थानिक नाल्यास येणाऱ्या पुरामुळे गावाचा काही भाग प्रभावित होतो.
(२), (३) व (४) गावाचे पुर्वेस खोलगट भागामुळे गावाचे बाजुस पाणी पसरते व गावात जाणारी वाहतुक बंद होते. आता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम मार्फत बेंबळा नदीवर पुलाचे काम सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात या वर्षी अतिशय कमी पाऊस पडल्यामुळे सोयाबीन या पिकाचे उत्पादन कमी झाल्याबाबत**

**(१६) २६९३ (२८-१२-२०१४). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात या वर्षी अतिशय कमी पाऊस पडल्यामुळे सोयाबीन या पिकाचे उत्पादन एकरी १ते २ क्विंटल झाले आहे व त्यामुळे शेतक-यांचा सोयाबीन पिक उत्पादनाचा उत्पादन खर्च ही निघू शकला नाही त्यांचे आर्थिक नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून आवश्यक ते सर्व्हेक्षण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, सदर सर्व्हेक्षणाचा अहवालात काय नमूद करण्यात आले आहे,
(४) असल्यास, संबंधित सोयाबीन उत्पादक शेतक-यांना शासनाकडून मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) हिंगोली जिल्हयात १२० गावात पीक कापणी प्रयोग घेण्यात आलेले होते. त्यानुसार सोयाबीनचे हेक्टरी उत्पादन २८६ किलो इतके आलेले आहे.
(४) खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये हिंगोली जिल्हयातील ७०७ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे. त्यानुषंगाने बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी पहिल्या टप्प्यात शासनाने हिंगोली जिल्हयासाठी रु.५५.४४ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधीचे वाटप क्षेत्रिय स्तरावर महसूल यंत्रणेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयातील हिंगणघाट शहरातील नदी व नाल्यावरील पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१७) २६९९ (२३-१२-२०१४). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरातील नदी व नाल्यावरील पुरग्रस्तांचे पुनर्वसन शासनाच्या जी.आर.प्रमाणे तातडीने आवश्यक असून सुध्दा माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुरग्रस्त विभागातील पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :**(१) हे खरे नाही. सन १९७९ मध्ये वणा नदीला आलेल्या पुरामध्ये बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन मौजा पिंपळगाव व मौजा नांदगाव (बो) येथे करण्यात आलेले आहे. मौजा पिंपळगाव येथे एकूण ११४२ भूखंड पुरग्रस्तांना देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मौजा नांदगाव (बो.) येथे ८०६ भूखंड टाकण्यात आलेले असून पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निळा (ता.पूर्णा, जि.परभणी) या गावाच्या पुनर्वसनाबाबत**

**(१८) २९६४ (२३-१२-२०१४). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निळा (ता.पूर्णा, जि.परभणी) या गावाच्या पुनर्वसनास सन २००७ मध्ये सुरुवात करण्यात येवून अद्याप घरांचे बांधकाम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावातील घरे सर्व प्राथमिक सुविधांसह (नळ लावणे, विद्युत जोडण्या) पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदरचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :**(१) होय.
(२) पुनर्वसन बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) निधी उपलब्धतेनुसार कामे त्वरीत पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनीवर पुर्ण करण्यात आलेली जलसंधारणाची व इतर कामे तसेच करारातील अटीचे पालन न करताच करण्यात आल्याबाबत**

**(१९) ३१४७ (२२-१२-२०१४). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या पाच वर्षापासून मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत बदनापूर, उस्मानाबाद, लातुर, नांदेड, आंबेजोगाई विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनीवर पुर्ण करण्यात आलेली जलसंधारणाची व इतर कामे केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सुचना प्रमाणे तसेच करारातील अटीचे पालन न करताच करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या कामाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, संबंधित दोषी विरुध्द शासनाने कोणती कायदेशीर कारवाई केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१५) :**(१) मागील पाच वर्षापासून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत बदनापूर, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, अंबाजोगाई येथील विद्यापीठाच्या मालकीच्या जमिनीवर जलसंधारणाची कुठलेही कामे करण्यात आलेली नाहीत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळकेवाडी-बोलाडवाडी, बौद्धवाडी (ता.चिपळून, जि.रत्नागिरी) हे गावठाण डोंगराळ व दुर्गम भागात असून अतिवृष्टी व सततच्या भूकंपामुळे या भागातील जमिनीला तडे गेले असल्याबाबत**

**(२०) ३१७३ (२३-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मदती व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळकेवाडी-बोलाडवाडी, बौद्धवाडी (ता.चिपळून, जि.रत्नागिरी) हे गावठाण डोंगराळ व दुर्गम भागात असून कोळकेवाडी धरणाच्या तीरावर वसलेले असून अतिवृष्टी व सततच्या भूकंपामुळे या भागातील जमिनीला सुमारे ५/६ फुटाच्या भेगा/तडे गेले असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभागाकडे यापूर्वीही पाहणी करून सदर गावठाणामध्ये राहणे अत्यंत धोकादायक असल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकत्याच माळीण (पूणे) येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर अशी धोकादायक घटना टाळण्याच्या दृष्टीने योग्य ती खरबदारी घेणे आवश्यक असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे वारंवार पत्रव्यवहार करून योग्य त्या तातडीच्या उपाययोजना करणेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०४-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.

(४) व (५) संभाव्य दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याचे प्रचलीत धोरण नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील शेतक-यांना कमी पाण्यात चांगल्याप्रकारे शेती उत्पादन करण्याचे तंत्र अवगत करण्याबाबत**

**(२१) ३२८२ (२२-१२-२०१४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील यंदाच्या वर्षी पावसाची सरासरी ४३४.९३ मि.मि. असल्यामुळे रब्बी हंगाम धोक्यात आला आहे व पाण्याअभावी यंदा रब्बीचे क्षेत्र गतवर्षीपेक्षा कमी राहण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील शेतक-याला कमी पाण्यात चांगल्याप्रकारे शेती उत्पादन करण्याचे तंत्र अवगत व्हावे, त्याची माहिती सर्व शेतक-यांना मिळावी यासाठी कृषी विभागातर्फे मोहिम हाती घेतली आहे काय,

(३) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१५) :**(१) होय

(२) प्रादेशिक कृषि प्रशिक्षण व्यवस्थापन संस्था औरंगाबाद मार्फत शेतावरील पाणी व्यवस्थापनाबाबत दि.२८.१.२०१५ ते ३०.१.२०१५ या कालावधीमध्ये क्षेत्रिय कृषि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून क्षेत्रित पातळीवर याबाबत प्रशिक्षित कृषि कर्मचाऱ्यांमार्फत शेतक-यांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याचे ही नियोजित आहे.

अन्य योजनेच्या माध्यमातून अदा. सूक्ष्म सिंचन प्लॅस्टिक अच्छादनाचा वापर, हरितगृहातील शेती, शेड नेट, फळबागासाठी शेततळे/सामूहिक शेततळे या घटकाच्या अंमलबाजवणीतून पाण्याचा काटेकोर वापर करुन अधिक शेती उत्पादन काढण्याचे तंत्र शेतक-यांपर्यंत पोहचविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पीक विमा योजनेचे निकष बदलविणेबाबत**

**(२२) ३५३३ (२२-१२-२०१४). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सध्या प्रचलीत जुन्याच पध्दतीनुसार पिक विमा काढल्या जातो, हे खरे आहे काय,

(२) विमा कंपनी शेताचा वैयक्तिक विमा उतरविले परंतू नुकसान भरपाई देतांना दहा गावांमध्ये नुकसान झाले किंवा नाही या निकषावर नुकसान भरपाई देते, हे खरे आहे काय,

(३) या जाचक अटींमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्षात आर्थिक मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) पीक विमा काढतांना दहा गावांमध्ये झालेल्या नुकसानीचा निकष लावून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचे कारण काय,

(५) असल्यास, पीक विमा योजनेच्या अटींमुळे सुधारणा केले नसल्याचे खरे आहे काय,

(६) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, पीक विम्याचा लाभ देतांना दहा गावांच्या नुकसानीचा निकष न लावता प्रत्यक्ष गावनिहाय नुकसानीचा निकष लावण्याबाबत सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५)** :(१) राष्ट्रीय कृषी विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून सदर योजना राज्यात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानूसार राबविण्यात येते.

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना राज्यात क्षेत्र हा घटक घरुन राबविण्यात येते. राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत निश्चित करण्यात येणारी नुकसान भरपाई ही पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त सरासरी उत्पन्नाच्या आधारे निश्चित केली जाते. योजनेंअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी आवश्यक असणारे अधिसुचित पिकनिहाय व मंडळ/मंडळगटनिहाय सरासरी उत्पन्न निश्चित करण्यासाठी संबंधीत मंडळात महसूल विभाग, कृषि विभाग व जिल्हा परिषद या यंत्रणामार्फत मंडळ/मंडळगट स्तरावर १२ पिक कापणी प्रयोग घेतने जातात. त्यापैकी किमान १० पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त झालेल्या मंडळ/मंडळगटनिहाय सरासरी उत्पन्नाची तुलना संबंधीत मंडळ/मंडळ गटाच्या उंबरठा उत्पन्नाशी करुन कमी आलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात कृषि विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चित केली जाते.

(३) हे खरे नाही. राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत सन १९९९-२००० पासून रब्बी हंगाम सन २०१३-१४ अखेर राज्यातील एकूण ३४५.५५ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु. १०३१.२३ कोटी विमा हप्ता भरुन ३०२.९४ लाख हेक्टर क्षेत्र संरक्षित केले होते त्यापैकी १०८ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु. २९२६.७४ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(४) राष्ट्रीय कृषि विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असल्याने या योजनेअंतर्गत अधिसुचित पिकासाठी अधिसूचित मंडळ/मंडळ गट अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये १२ पिक कापणी प्रयोगाचे किंवा तालुका/तालुका गट अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये १८ पिक कापणी प्रयोगाचे आयोजन करुन त्याद्वारे प्राप्त झालेले मंडळ/मंडळ गट निहाय किंवा तालुका/ तालुकागटनिहाय सरासरी उत्पन्न व त्या मंडळ/मंडळगटाचे किंवा तालुका/तालुकागटाचे उंबरठा उत्पन्न या अधारे नुकसान भरपाई निश्चित करण्यात यावी अशी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई निश्चित करताना अधिसुचीत मंडळ/मंडळगटामध्ये किंवा तालुका/तालुकागटामध्ये समाविष्ट गावांच्या उत्पन्नाच्या निकष लावला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) सदरची योजना ही केंद्रशासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट, समुद्रपूर, सिंदी रेल्वे या तालुक्यात कापसाच्या पिकावर मोठ्या प्रमाणात लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(२३) ३६०१ (२३-१२-२०१४). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट, समुद्रपूर, सिंदी रेल्वे या तालुक्यात कापसाच्या पिकावर मोठ्या प्रमाणात लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने कापसाचे सरासरी उत्पादन एकरी १ क्विंटलपेक्षा कमी उत्पन्न आल्यामुळे उत्पादन खर्च भरून येणे कठीण झाले आहे व यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणघाट, समुद्रपूर, सिंदी रेल्वे तालुक्यांना तात्काळ दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना एकर रूपये १५,०००/- या प्रमाणे आर्थिक मदत देण्यात यावी, बँकेची कर्ज वसूलीस त्वरीत स्थगिती देण्यात यावी, शेतकऱ्यांचे वीज बील संपूर्ण माफ करण्यात यावे, अशा मागण्या स्थानिक शेतकऱ्यांमधून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रश्न भाग २ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्‌याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) वर्धा जिल्हयाची सन २०१४ ची खरीप हंगामातील पिकांची १३६१ गावंची अंतिम पैसेवारी ५० पेशांपेक्षा कमी आल्यामुळे सदर गावांमध्ये टंचाईसदृश्य परिस्थिती जाहिर करुन शासनाने खालील उपाययोजना लागू केल्या आहेत :-

१) जमीन महसूलात सुट

२) सकारी कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती

४) वीज बिलात ३३.५% इतकी सुट

५) परीक्षा शुल्कात माफी (इयत्ता १० वी व १२ वी)

६) रोहयो अंतर्गत कामांच्या निकषांत काही प्रमाणात शिथीलता

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाच्या वीज जोडणी खंडीत न करणे,

तसेच वर्धा जिल्ह्यातील खरीप २०१४ मधील बाधीत शेतकऱ्यांना रु. ५३.७४ कोटी एवढ्या अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील कामगारांच्या सेवा नियमित करून सेवेत सामावून घेणेबाबत**

**(२४) ३९८३ (२२-१२-२०१४). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांनी विद्यापीठात प्रदिर्घ कालावधीसाठी रोजंदारी मजुर म्हणून सेवा केलेल्यांच्या तात्पुरत्या नियुक्त्या वन विभागाने दि. ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर विद्यापीठातील रोजदारी मजुरांच्या सेवा नियमित करण्याकरीता अपर मुख्य सचिव (कृषी) महाराष्ट्र शासन यांच्याकडे दि. ३१ मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्याकरिता कृषी मंत्री आणि अपर मुख्य सचिव (कृषी व पणन) यांना दि. ३ ऑक्टोबर, २०१३ रोजी व त्यासुमारास लोकप्रतिनीधीव्दारा निवेदन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. मात्र रोजंदारी मजुरांच्या सेवा नियमित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून त्याबाबतचे आदेश पारीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील काही परिसरामध्ये कपाशी पिकांवर लाल्या रोग आल्याने शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(२५) ४३०८ (२२-१२-२०१४). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील काही परिसरामध्ये कपाशी पिकांवर लाल्या रोग आल्याने सोयाबीन पिकासह आता रोख रक्कम देणारे सदरहू कपाशी पिक असून या पिकांवर लाल्या रोग्य झाल्याने सदरहू पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या कपाशी पिकांचे शासन सर्व्हे करुन त्यांना नुकसान मिळण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) खरीप हंगाम २०१४ मध्ये अमरावती जिल्ह्यात १९६५२६ हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची पेरणी झालेली होती. त्यापैकी २९४३१ हेक्टर क्षेत्रावरील (१४ ते १५%) कापूस पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला होता. त्याकरिता लाल्या रोगाविषयी शेतक-यांना मार्गदर्शन करण्याकरिता क्षेत्रिय भेटी, शास्त्रज्ञ भेटी, शेतकरी प्रशिक्षण तसेच, ग्रामपंचायत स्तरावर भिंतीपत्रके लावणे, माहितीपत्रके वाटप करणे इत्यादी प्रकारे कार्यवाही करण्यात आली.

अमरावती जिल्ह्यात खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये १९८१ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आल्याने बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासनाने पहिल्या टप्प्यात रु.१२५.७९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर मदतीचे वाटप क्षेत्रिय स्तरावर महसूल यंत्रणेमार्फत चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील २७९ रोजंनदारी कुशल/अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सामावून घेणेबाबत

**(२६) ४४४५ (२२-१२-२०१४). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील सध्या कार्यरत असलेले २७६ रोजंनदारी कुशल अर्धकुशल कर्मचारी गेल्या २५ ते ३० वर्षा पासून रोजंदारीवर कार्यरत असून त्यांना कायम आस्थापनेवर पुर्वलक्षी प्रभावाने घेण्यासाठी देण्यात आलेला प्रस्ताव अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, घेतला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे, व त्याबाबतची शासनस्तरावरची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास,शासनाने सदरहू रोजंदारीवर काम करणा-या कर्मचा-यांना कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) पश्चिम भागातील निमसागर येथे वीर धरणग्रस्तांना पायाभूत सुविधा पुरवण्याबाबत

**(२७) १०९७१ (०८-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) पश्चिम भागातील निमसागर येथे वीर धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे मात्र तेथे पाणी, रस्ते, वीज यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकल्पग्रस्त गावात पायाभूत सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र. आरपी/१०६६, आर १, दि.१२/०८/१९६७ अन्वये पुरवावयाच्या सुविधांपैकी देऊळ/प्रार्थनास्थळ वगळता इतर पायाभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्प सन १९७६ पुर्वीचा असून पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा पुरवणेबाबतच्या धोरणांमध्ये सन १९७६ नंतर वेळोवेळी झालेल्या बदलांप्रमाणे त्या त्या वेळी अस्तित्वात आलेल्या सन १९७८ च्या नियमांनुसार ६ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(२) होय. सदर प्रकरणी यापूर्वीच वस्तुस्थितीदर्शक अहवाल उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पुणे यांचेकडून मागविण्यात आला आहे.

(३) सद्य:स्थितीत महाराष्ट्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार देय नागरी सुविधांपैकी सदर गावास देय नागरी सुविधा देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अवकाळी पाऊस व गारपीटीचा फटका बसलेल्या शेतक-यांच्या मदतीसाठी केंद्र शासनाकडे मदतीची मागणी करण्यात आल्याबाबत

**(२८) १६२८३ (१९-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवकाळी पाऊस व गारपीठीने उध्दवस्त झालेल्या राज्यातील शेतक-यांना केंद्र सरकारची मदत मिळण्यास विलंब झाला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तब्बल २ लाख ४६ हजार २५६ हेक्टर जमिनीवरील पिकांची नासाडी झाल्याचे सांगतानाच केंद्रीय आपत्ती निवारण कोशातून (एनडीआरएफ) आर्थिक मदत मिळण्यासाठी अत्यावश्य असलेला प्रस्ताव राज्य सरकारने पाठविला नसल्याचे केंद्रिय कृषीमंत्री राधामोहन सिंह यांनी दि.८ मे २०१५ रोजी राज्यसभेत प्रश्नोत्तरांच्या तासाला स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यांककडून शेतीच्या नुकसानाबाबत प्रस्ताव न येण्याचा प्रकार अलिकडच्या काळात किमान तिस-यांदा घडला आहे असेही त्यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कैंद्राने राज्याला आपत्ती निवारण कोशातून (एनडीआरएफ) मधून काही मदत हवी असेल तर प्रस्ताव द्या, असे सांगितले असतानाही राज्य शासनाकडून प्रस्तावच पाठविलेला नाही, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाकडून एनडीआरएफ मधून मदत मिळवण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यास विलंब करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच राज्यातील शेतकऱ्यांना एनडीआरएफ मधून लवकरात लवकर मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ या कालावधीत २.६८ लक्ष हेक्टर शेती व फळपिकांचे ५०% पेक्षा अधिक नुकसान झाले आहे. सदर नुकसानीसाठी राज्य शासनाने दिनांक १३.४.२०१५ च्या शासन निर्णयानुसार विशेष दराने मदत दिली आहे. त्यासाठी रु. ४८१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या एसडीआरएफ च्या निकषानुसार गारपीट या आपत्तीसाठी मदत अनुज्ञेय आहे. या निकषानुसार परिगणना केली असता रु. १८० कोटी इतकी मदत अनुज्ञेय होते.

फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट ही नैसर्गिक आपत्ती सलगपणे आलेली नसून, काही कालखंडानंतर झालेली आहे. त्यामुळे आपत्तीबाबतची तिव्रता आकलन झाली नाही वरील पार्श्वभूमीवर फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्याबाबतचा निधी मागणीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला नाही. सदर आपत्ती राज्य शासन स्तरावर हाताळण्यात आली असून, आपदग्रस्तांना विशेष दराने मदत देण्यात आली आहे.
(५) व (६) राज्य शासनाने विशेष दराने मदत देण्याचा निर्णय घेतल्याने केंद्र शासनाकडे वरील नैसर्गिक आपत्तीसाठी निधीची मागणी करण्यात आलेली नाही.

---

**नैसर्गिक आपत्तीतील बाधीतांच्या पीक नुकसानीसाठी किमान ५० टक्के नुकसानीची अट शिथिल करण्याबाबत**

**(२९) १६५२२ (१२-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नैसर्गिक आपत्तीतील बाधीतांच्या पीक नुकसानीसाठी किमान ५० टक्के नुकसानीची अट आता शिथील करण्यात आली असून नवीन निकषानुसार ३३ टक्के नुकसानही शासनाच्या मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे तसेच नुकसान भरपाईच्या प्रमाणात ही ५० टक्क्यांनी वाढ करण्यात आली असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नुकसान भरपाईची योजना योग्य रितीने राबविण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-१०-२०१५) :**(१), (२), (३) केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणा-या आपदग्रस्त व्यक्तींना सन २०१५ ते २०२० या कालावधीमध्ये द्यावयाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित दर व निकष निश्चित केले असून त्यानुसार राज्यात सदर दर दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून लागू करण्याचा निर्णय दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार शेती पिके, फळ पिके आणि वहुवार्षिक फळ पिकांच्या ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसानीकरिता प्रतिहेक्टरी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसर कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

| कोरडवाहू क्षेत्र | आश्वासित जलसिंचन क्षेत्र | बहुवार्षिक पिके |
|---|---|---|
| रु.६८००/- | रु.१३५००/- | रु.१८०००/- |

---

**विदर्भात कृषी विभागात सुमारे ८८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) १६८०६ (१७-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात कृषी विभागात सुमारे ८८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ विभागातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) होय. विदर्भातील अमरावती विभागातील ८४१ व नागपूर विभागातील १०५५ इतकी पदे मे, २०१५ अखेरीस रिक्त होती.
(२) कृषी आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील एकूण ६२०६ रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या कोटयातील गट-अ, ब व क ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने घा ातलेले निर्बंध विचारात घेऊन पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क व ड संवर्गाची व विशेषत: कृषी सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याविषयी कृषि आयुक्तालयास पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या**
**शासकीय अनुदानामध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३१) १७३०७ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शासकीय अनुदानामध्ये ९० ते १०० शेतकऱ्यांची साकळी तयार करुन त्यांचे खात्यावर पाच सहा वेळा अनुदान संबंधित बँकाकडे पाठविण्याचा प्रकार निलंबित तलाठी उज्जैनकर यांनी करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून या प्रकरणी काही संबंधित कार्यालयातील कर्मचारी यामध्ये सहभागी असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत दिली तर काही शेतकऱ्यांना अजूनही मदत दिली नसल्याने त्यांना हेलपाटे मारावे लागत असल्याचे तसेच काही शेतकऱ्यांनी चुकीचे खाते क्रमांक दिल्याने त्यांच्या नांवावर एकही गुंठा देखील जमीन नसतांना त्यांना लाखो रुपये मिळाले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४)असल्यास चौकशीच्या अनुषंगाने भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-११-२०१५) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. तथापि, ज्या शेतक-यांनी बॅक खाते क्रमांक दिले नाहीत किंवा चुकीचे खाते क्रमांक दिलेत त्या शेतक-यांना मदत वितरीत करण्यास विलंब झाला. तसेच अद्‌यापही शेतक-यांची खाते क्रमांक प्राप्त करुन मदत वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) होय. दोषी तलाठी यांना निलंबित करुन त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे व इतर दोषी कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे असलेले भूकंपमापन**
**केंद्र वर्षभरापासून बंद असल्याबाबत**

**(३२) १८३९६ (०६-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे असलेले भूकंपमापन केंद्र वर्षभरापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भूकंपमापन केंद्राच्याजवळ कोयना वीज प्रकल्पांमधील कोळकेवाडी पोफळी वीजगृह, कोळकेवाडी धरण हा महत्वाचा भाग आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे भूकंपमापन केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-११-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) सद्य:स्थितीत National Geophysical Institute Hyderabad यांचेमार्फत कोयना धरण परिसरात भुकंप मापन व त्यानुषंगाने इतर तत्सम सर्वकष अभ्यास करण्यासाठी कोयना प्रकल्प परिसरातील कोयनानगर, महाबळेश्वर, कोल्हापूर व रत्नागिरी येथील भुकंपमापन वेधशाळा अद्यावत स्वरुपात सुरु राहणार आहेत. तथापि मोजे अलोरे (जि.रत्नागिरी ता.चिपळूण) येथील भुकंपमापन केंद्र एप्रिल, २०१३ पासून बंद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील वेणेखोल ग्रामस्थांच्या जमिनीवर उरमोडी हे धरण**
**उभारून या प्रकल्पबाधित कुटुंबाचे पुर्नवसन न केल्याबाबत**

**(३३) १८७१२ (१७-०८-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील वेणेखोल ग्रामस्थांच्या १० हेक्टर जमिनीवर १८ वर्षापूर्वी उरमोडी हे धरण उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १८ वर्ष होवूनही या प्रकल्पबाधित कुटुंबाचे पुर्नवसन अद्याप केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरमोडी धरणासाठी संपादित केलेल्या ग्रामस्थांचे पुर्नवसन म्हसवड येथे करण्यात यावी अशी मागणी सतत १८ वर्षे करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी आपल्या कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा निर्णय शासनाला माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, ग्रामस्थांच्या मागण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-१२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

उरमोडी धरणासाठी वेणेखोल येथील ग्रामस्थांची २५.७१ हे. जमिन संपादीत करण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) वेणखोल गावाचे पुनर्वसन म्हसवड येथे करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. त्या मागणीसाठी प्रकल्पग्रस्तांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये आंदोलनाचा इशारा दिला होता. दिनांक ०९.०८.२०१५ रोजीच्या आदेशानवये वेणेखोल पुनर्वसनाच्या मुळ नियोजनात बदल करुन मौजे म्हसवड येथे पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात येत आली असुन त्यानुसार १३९.५४ हे. आर जमिन संपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाप्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या निर्णयाबाबत**

**(३४) २०३०६ (११-०८-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)वादळ, गारपीठ, अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे कृषी उत्पन्न, फळबाग इ. शेतकऱ्यांच्या पिकाचे ३३ टक्के नुकसान झाल्यास महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचा तसेच दर हेक्टरी मदतीच्या रकमेमध्ये वाढ करण्याचा निर्णय दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मदतीची रक्कम पिकासाठी, फळबागेसाठी दर हेक्टरी किती राहणार आहे,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या पिकाचे ३३ टक्के नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्याबाबत व दर हेक्टरी मदतीच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-१०-२०१५)** :(१), (२), (३) व (४) केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणा-या आपदग्रस्त व्यक्तींना सन २०१५ ते २०२० या कालावधीमध्ये द्यावयाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित दर व निकष निश्चित केले असून त्यानुसार राज्यात सदर दर दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून लागू करण्याचा निर्णय दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार शेती पिके, फळ पिके आणि वहुवार्षिक फळ पिकांच्या ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसानीकरिता प्रतिहेक्टरी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत.

| कोरडवाहू क्षेत्र | आश्वासित जलसिंचन क्षेत्र | बहुवार्षिक पिके |
|---|---|---|
| रु.६८००/- | रु.१३५००/- | रु.१८०००/- |

---

**राज्यात अतिवृष्टी वा नैसर्गिक आपत्तीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई म्हणून फळपिक विमा योजना राबविण्याबाबत**

**(३५) २१२२२ (१२-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टी वा नैसर्गिक आपत्तीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासनाने नव्या स्वरुपाची फळपिक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या फळपिक विमा योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व ती तातडीने लागू करण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही. हवामानावर आधारित फळपिक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०११-१२ पासून राबविण्यात येत आहे, या योजनेमध्ये अवेळी, पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, सापेक्षा आर्द्रता, वेगाचा वारा, जास्त पाऊस व गारपीट या नैसर्गिक आपत्ती घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्ताना भूकंपग्रस्ताचे दाखले मिळणेबाबत.**

**(३६) २१८६४ (०६-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील भुकंपग्रस्ताना भूकंपग्रस्ताचे दाखले देणेसंदर्भात दिनांक १५ जून, २००९ रोजी राज्य शासनाच्या वतीने राज्याचे तत्कालीन मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी विधानसभा सभागृहात राज्य शासनाच्या वतीने आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही याबाबत राज्य शासनाचा निर्णय न झाल्याने पाटण तालुक्यातील भूकंपग्रस्त जनतेकडून भूकंपग्रस्त दाखल्याची सातत्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने भूकंपग्रस्तांना दाखले देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) भुकंपग्रस्तांना भुकंपग्रस्ताचे दाखले देणेबाबतचा शासन निर्णय अंतीम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड तालुक्यातील पुनर्वसन गावठानामध्ये नागरी सुविधा निर्माण करण्याबाबत**

**(३७) २८२४९ (२६-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील पुनर्वसन गावठाणामध्ये नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी व प्रलंबित मागणीसाठी बैठक आयोजित करणेबाबत स्थानिक वि.स.स. यांनी मा.महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५ महिने उलटूनही अद्याप बैठक आयोजित करण्यात आली नसून सदरहू, बैठक आयोजित करण्यासाठी व निवेदनातील मागण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार बैठक किती कालावधी मध्ये आयोजित करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, बैठक आयोजित न करण्याची व उक्त निवेदनातील मागण्या संदर्भा अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) मा.विधानसभा सदस्य यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने दि. २३/११/२०१५ रोजी बैठक पार पडली असून पुनर्वसन धोरणानुसार देय असलेल्या परंतु अद्यापपर्यंत पुरविण्यात न आलेल्या सुविधांच्या आढावा घेऊन शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या तसेच पुरविण्यात आलेल्या परंतु दुरुस्तीची/देखभालीची गरज असलेल्या सुविधांबाबत धोरणात्मक निर्णय धेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितास देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय पिकविमा योजनेत जास्तीत जास्त शेतक-यांनी समाविष्ट व्हावे याकरिता आणखी मुदतवाढ देण्याबाबत**

**(३८) ३३९७५ (१५-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय पिकविमा योजनेत जास्तीत जास्त शेतक-यांनी समाविष्ट व्हावे याकरिता शासनाने पीकविमा भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे परंतू ही मुदतवाढ शेतक-यांसाठी उपयोगाची नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमरास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतक-यांना कोरड्या दुष्काळाचा सामना करावा लागत आहे तसेच नांदेड जिल्हयातील काही शेतक-यांनी दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले होते यामुळे विमा योजनेचे संरक्षण शेतकऱ्यांना लाभावे याकरिता शासनाकडून विमा योजना विविध पिकांसाठी लागू करण्यात आली व विमा भरण्याची ३१ जुलै, २०१५ ही शेवटची तारीख होती मात्र विमा योजनेला मुदतवाढ द्यावी यासाठी शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींनी तगादा लावल्यानंतर ही मुदतवाढ ७ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली परंतु मुदतवाढही शेतक-यांसाठी कुचकामी ठरली आहे तरी आणखी मुदतवाढ देण्याबाबत शासन विचाराधीन आहे अथवा नाही,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१) व (२) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी १९९९-२००० पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात क्षेत्र हा घटक धरुन भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने मार्गदर्शक सुचनांनुसार खरीप हंगामामध्ये योजनेंत सहभाग घेणेसाठी ३१ जुलै ही अंतीम तारीख ठरिवण्यात आलेली आहे. परंतु राज्यातील उशीरा सुरु झालेला पाऊस तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे पेरण्या लांबल्याने खरीप २०१५ मध्ये शेतकरी सहभागाची मुदत वाढवून प्रथम ती दि. ७ ऑगस्ट, २०१५ पर्यंत वाढविण्यात आली होती व त्यानंतर पुन:श्च दि. १५ सप्टेंबर, २०१५ अशी वाढविण्यात आली होती. सदर वाढीव मुदत ही,दि. १ ऑगस्ट, २०१५ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत पिकांची पेरणी केलेल्या शेतकऱ्यांसाठी लागू होती.

खरीप २०१५ हंगामात नांदेड जिल्हयातील ४.९२ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु. १७.११ कोटी विमा हप्ता भरुन २.८१ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ७०० कोटीची कृषी महाविद्यालयाची मालमत्ता धुळे कृषी महाविद्यालयात असल्याबाबत**

**(३९) ३४०७७ (१५-०१-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी कृषी महाविद्यालयाची ६०० एकर जमिन, तसेच पिंप्री फॉर्मची ५० एकर जमिन देखील उपयोगात आणता येणे शक्य असून ३०,००० पुस्तकांचे ग्रंथालय, ७०० कोटीची कृषी महाविद्यालयाची मालमत्ता आजच्या स्थितीत धुळे कृषी महाविद्यालयात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे शहर हे जळगांव, नाशिक आणि नंदूरबार हे तिन्ही जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून राष्ट्रीय महामार्ग क्र.३ आणि राष्ट्रीय महामार्ग ६ वर येत असल्याने दळणवळणाच्या सर्व सुविधा याठिकाणी उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातील कापूस, कडधान्य, ज्वारी, बाजरी या पीकांच्या संशोधनासाठी धुळे येथे वाव असल्याचे तज्ञांचे मत असल्याने सर्व सुविधा पाहता धुळे येथे कृषी विद्यापीठाची स्थापना करावी अशी मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :**(१) कृषि महाविद्यालय धुळे येथे ६०० एकर जमिन, तसेच पिंप्री फॉर्मची १०२ एकर जमीन आहे. त्याचप्रमाणे कृषि महाविद्यालयातील ग्रंथालयात ४०,४६९ पुस्तके आहेत.
(२) धुळे शहर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ आणि राष्ट्रीय महामार्ग ६ या दोन महामार्गावर वसलेले आहे. धुळे ते नंदुरबार अंतर साधारणपणे १०० कि.मी. तर निशिक १६०कि.मी. आहे.
(३) धुळे येथे कृषि विद्यापीठ स्थापन करावे अशी मागणी आहे.
(४) व (५) दि. १९ ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषि विद्यापीठ , राहुरी या विद्यापीठांचा विस्तार लक्षात घेऊन त्यांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठ आवश्यक आहे का याची तपासणी करुन शासनास मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.वाय.एस.पी. थोरात यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती.

सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक तपशील प्राप्त करण्यासाठी दि. १४ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरलू, कुलगुरु वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर समितीच्या अहवालात नवीन कृषि विद्यापीठ स्थापनेच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या अहवालावर यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**वाघाळा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील ज्ञानेश्वर भाऊराव राठोड, यांच्या शेतात केलेल्या कपाशीच्या लागवडीला किडींचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(४०) ३४२८० (१५-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाळा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील ज्ञानेश्वर भाऊराव राठोड,यांच्या शेतात केलेल्या कपाशीच्या लागवडीला किडींचा प्रादुर्भाव होऊ लागल्याने किटकनाशक फवारणी केली असता अवघ्या दोनच तासांत कपाशी सुकुन गेल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर,२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२)असल्यास,उक्त शेतक-यांचे दोन लाखांचे नुकसान झाले असून संबंधित किटकनाशक कंपनीवर कारवाई करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांने केली आहे हे ही खरे आहे काय

(३) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार दोषी कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतक-याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०८-२०१६) :**(१) होय,

(२) होय, हे खरे आहे.

(३) या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तालुका कृषि अधिकारी व कृषि अधिकारी (पंचायत समिती), सिंदखेडा राजा यांनी पाहणी केली असता तक्रारदार शेतकऱ्यांच्या शेतातील कपाशीची झाडे पुर्णत: सुकण्यास/वाळून जाण्यास सुरुवात झाल्याचे आढळून आले.

(४) कृषि केंद्रधारकाकडून नुकसान भरपाई देण्यात आलेली असल्याने तक्रारदार शेतकऱ्याने तक्रार मागे घेत असल्याबाबत पतिज्ञापत्र सादर केल्याने कृषि केंद्र धारकावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री.पी.व्ही.उन्हाळे, विभागीय बिज प्रमाणीकरण अधिकारी, अकोला यांचा अतिरिक्त कार्यभार त्वरित काढून घेण्याबाबत**

**(४१) ३४२८८ (१५-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.पी.व्ही.उन्हाळे, विभागीय बिज प्रमाणीकरण अधिकारी, अकोला यांनी केलेला गैरव्यवहार तसेच शासनाची दिशाभूल करुन एकाच ठिकाणी कार्यरत असल्याबाबत तसेच राज्यातील सर्व खाजगी बिजोत्पादक संस्थांना जाणूनबुजून त्रास देणे, खरीप हंगाम बिजोत्पादन नोंदणी व तपासणी तसेच इतर अनेक प्रकरणे जाणुनबुजुन प्रलंबित ठेवणे, कार्यालयात वर्चस्व दाखवून

विभागीय बिज प्रमाणीकरण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सुध्दा स्वत: च हस्तांतरीत करुन घेणे आदि तक्रारी बुलडाणा जिल्हा सिड प्रोसेसिंग प्लॅन्ट असोसिएशन, चे अध्यक्ष/सचिव यांनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास कृषी मंत्री महा. राज्य तसेच मा.कृषी आयुक्त, कृषी संचलनालय, पुणे यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी करुन मा.विभागीय बिज प्रमाणीकरण अधिकारी, अकोला श्री.पी.व्ही.उन्हाळे यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्याकडून विभागीय बिज प्रमाणीकरण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार त्वरित काढून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६)** :(१) होय.
(२) संचालक, महाराष्ट्र बीज प्रमाणिकरण यंत्रणा, अकोला यांनी या प्रकरणी चौकशी केली असून त्यामध्ये तथ्य दिसून आले नाही. श्री. उन्हाळे यांच्या विनंतीनुसार त्यांचा या पदाचा अतिरिक्त पदभार संपुष्टात आणला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत कोकणातील पाच जिल्हयातील सुमारे ९ हजार कृषी गावांतील जमिनीचा कृती आराखडा तयार करण्याबाबत**

**(४२) ३४६१० (१५-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातंर्गत कोकणातील पाच जिल्हयातील सुमारे ९ हजार कृषी गावांतील जमिनीची आरोग्य पत्रिका काढण्याची मोहिम कृषि विभागातर्फे करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोहिमेवर कधीपासून अंमलबजावणी होणार आहे व याकरिता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, चालू सन २०१५-१६ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून त्याबाबतचा कृति आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
(३) मृत आरोग्य पत्रिका कार्यक्रम चालू सन २०१५-१६ या वर्षापासून केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात राबविण्यात येत आहे. यामध्ये आगामी ३ वर्षाच्या कालावधीत राज्यातील सर्व गावांची टप्पा टप्प्याने निवड करुन ३ वर्षात राज्यातील सर्व शेतकऱ्यांना, जमिन आरोग्य प्रत्रिकेच्या माध्यमातून, त्यांच्या शेत जमिनीची रासायनिक गुणधर्म स्थिती, प्रमुख अन्नद्रव्यांची पातळी व सुक्ष्म मुलद्रव्य कमतरता स्थितीची माहिति देण्यात येणार आहे. या

योजनेत बागायत क्षेत्रासाठी २.५० हे क्षेत्रापासून एक मृत नमुना तर जिरायत क्षेत्रासाठी १० हे क्षेत्रातुन एक मृद नमुना काढण्यात येणार आहे व सदर क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकेचे वितरण करण्यात येणार आहे.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील धानोराचे तत्कालीन तालुका कृषी अधिकारयावर फोजदारी गुन्हा दाखल करून भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत**

**(४३) ३४७१२ (१२-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुका कृषी कार्यालयाचे तत्कालीन तालुका कृषी अधिकार याने सन २०१३-१४ मध्ये गतिमान पाणलोट योजने अंतर्गत सायागाटा येथील १७ लक्ष ५० हजार आणि कन्हाळगाव येथील ३६ लक्ष ५० हजार रुपयाचा गैरप्रकार करणे तसेच कोकडकसा व देऊळगाव परिसरात २ कोटी २५ लक्ष रुपये निधीमध्ये २२५ शेततळ्याचे बांधकाम न करता बोगस व बनावट कागदपत्राद्वारे करोडो रुपयांचा गैरप्रकार केल्याची तक्रार माहे १ आक्टोंबर २०१५ तसेच १ जानेवारी २०१५, मार्च २०१५, एप्रिल २०१५, मे, २०१५, जुलै २०१५ च्या सुमारास लोक प्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, कृषी मंत्री, जलसंधारण राज्यमंत्री, अप्पर मुख्य सचिव कृषी विभाग यांना वारंवार दिले असतांना अद्यापही या गंभीर प्रकरणाची चौकशी व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आले नसल्याची माहिती दिनांक २८ आक्टोंबर २०१५ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय मुंबई यांना लोकप्रतीनिधिनी दिनांक ५/१/२०१५ रोजी दिलेल्या निवेदनावर तात्काळ एफआयआर करायला लावा असे निर्देश दिल्यानंतर कृषी विभागाचे कार्यासन अधिकारी यांनी पत्र क्र तक्रार-२०१५/पराक्र-१२/५अ दि २०/१/२०१५ नुसार सदर गंभीर प्रकरणाची तात्काळ एफआयआर दाखल करून या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करावे असे कृषी आयुक्त, पुणे यांच्या नावे अनेक स्मरणपत्र पाठविले असताना सुध्या गेल्या दहा महिन्यापासून सदर प्रकरण प्रलंबित ठेवण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री महोदय यांनी पत्र क्र मुमस/१०४८९३२ दिनांक ६ मे,२०१५ रोजी दिले असतांना सुध्या पाच महिन्यापासून अद्यापही चौकशी करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन तालुका कृषी अधिकार यास ३१ जुलै२०१५ रोजी नाममात्र निलंबित करण्यात आले असून या गंभीर प्रकरणाची सखोल चैकाशी करून संबंधीतावर एफआयआर दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) या प्रकरणी दक्षता पथक , कृषि आयुक्तालय, पुणे यांनी प्राथमिक चौकशी करुन शासनास अहवाल सादर केला, त्याआधारे

संबंधित तत्कालीन तालुका कृषि अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे. प्राथमिक चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारत घेऊन संबंधिताविरुध्द एफआयआर दाखल करण्यात आलेला नाही, तथापि, संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी सवलत न मिळाल्या बाबत**

**(४४) ३४७४४ (१३-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार कृषी विद्यापीठातील मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित कृषी अभ्यासक्रमासाठी शासकीय कोट्यासाठी आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांना मिळत असलेल्या ई.बी.सी. सवलतीचा लाभ देण्यात येत नाही हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त सवलत बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कृषी विद्यापीठामध्ये शेतकऱ्यांची मुले मोठ्या प्रमाणावर शिकत असल्यामुळे व सध्या दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे हि सवलत त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अपु-या बससेवेमुळे महाराष्ट्र राज्य महामंडळाची बस सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत.**

**(४५) ३४७९७ (१३-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर महानकरपालिकेच्या हद्दीत महाराष्ट्र राज्य महामंडळाची बस सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी तसेच प्रवासी संघटनेने दि.१२ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.परिवहन मंत्री तसेच मिरा भाईंदर महापालिका आयुक्त, व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मिराभाईंदर यांना निवेदन दिले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिरा भाईंदर महानकरपालिकेच्या हद्दीत महाराष्ट्र राज्य महामंडळाची बस सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :**(१) होय.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून त्यांच्या परिसरात बस सेवा चालविण्याबाबत सन २००५ मध्ये राज्य परिवहन महामंडळास “ना हरकत दाखल” देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार राज्य परिहवन महामंडळाचे हक्क अबाधित राखून राज्य परिवहन महामंडळाची वाहतूक एकदा हस्तांतरित केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव ही राज्य परिवहन महामंडळाकडून पुन:श्च चालविली जाणार नाही, या अटीवर मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास ना हरकत दाखल दिलेला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून हस्तांतरीत केलेले महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक सेवा सुरु ठेवणे ही संबंधित महानगरपालिके/नगरपालिक यांची जबाबदारीअसल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाकडून पुन:श्च वाहतूक सुरु करण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नायगाव तालुक्यातील कुंटूर येथील बस स्टण्ड जवळ असलेले देशी दारूचे दुकान गावाबाहेर हटविण्याबाबत

**(४६) ३४९४९ (१२-०१-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंटूर (ता.नायगाव) येथील बस स्टण्ड जवळ असलेले देशी दारूचे दुकान गावाबाहेर हटविण्याबाबत मा.जिल्हाअधिकारी यांनी राज्य विभागीय उत्पादन शुल्क अधिकारी यांना आदेश दिले परंतू त्यावर अद्याप काहीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे सप्टेंबर,२०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने चौकशी करून सदर देशी दारूचे दुकान गावाबाहेर हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घनसावंगी (जि.जालना) तालुका कृषी अधिकारी कार्यालयास कायमस्वरुपी अधिकारी नसल्याबाबत

**(४७) ३५०१८ (१५-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुका कृषी अधिकारी कार्यालयास कायमस्वरुपी अधिकारी नसल्याने शासनाच्या अनेक योजनांवर अंमलबजावणी अभावी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारीच नसल्यामुळे शेतकऱ्यांना दुष्काळात पेरणीसाठी असलेले बियाणे घेण्यासाठी वाट पाहावी लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून कामे वेळेत पूर्ण करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल तालुक्यातील (जि.चंद्रपूर) शेतकरी राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेअंतर्गत मिळणा-या विम्यापासुन वंचित असल्याबाबत

**(४८) ३५०६७ (१५-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल तालुक्यातील (जि.चंद्रपूर) तीन हजार २१३ शेतकरी राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेअंतर्गत मिळणा-या विम्यापासुन वंचित असल्याचे माहे ऑगस्ट,२०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे शेतकरी पिक विम्यापासून वंचित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या शेतक-यांना तातडीने पिक विम्याचा लाभ देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :**(१) खरीप हंगाम २०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील मुल तालुक्यातील ५६१२ शेतकऱ्यांनी रुपये ३२.०९ लाख विमा हप्ता भरुन राष्ट्रीय कृषि विमा योजनेत सहभाग घेतला होता त्यापैकी ४१शेतकऱ्यांना रुपये ०.६७ लाख नुकसान भंरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली. जून व जुलै २०१५ मध्ये सदर नुकसान भरपाई लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत येणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात येते.

या योजनेअतर्गत महूलस मंडळ / तालुकास्तरावर घेण्यात येणाऱ्या पीक कापणी प्रयोगांवर आधारित सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांची तुलना करुन निश्चित केलेल्या सुत्रानुसार सरासरी उत्पन्न उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी असल्यास कमी आलेल्या उत्पन्नाच्या आधारे नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत दिली जाते. केंद्र शासनाच्या सुत्रानुसार पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना वरीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.
(३) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत खरीप २०१४ मधील मूल तालुक्यातील नुकसान भरपाईस पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम भारतीय कृषि विमा कंपनी मार्फत माहे जून व जुलै, २०१५ मध्ये अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तालुका कृषी अधिकारी नांदगाव कार्यालयातील**
**(ता.नांदगाव जि.नाशिक) रिक्त पदे भरणेबाबत**

**(४९) ३५५३१ (१३-०१-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी नांदगाव कार्यालयातील कृषी अधिकारी, कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, ट्रेसर व अन्य अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उपरोक्त कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबतची मागणी नांदगाव विधानसभा मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी माननीय कृषीमंत्री यांच्याकडे दि.२४/७/२०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेप्रमाणे सरळसेवा कोट्यातील ५० पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे. तसेच पदांचा आढावा व अद्ययावत जेष्ठता सूची प्रसिध्दीची कार्यवाही झाल्यानंतर सदर संवर्गात पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व ड मधील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात अनुक्रमे कृषि आयुक्तालय व विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील श्रीवर्धन येथे नविन बसस्थानकाचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(५०) ३५७२३ (२०-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील श्रीवर्धन येथील एस.टी.बसस्थानकाची इमारत जीर्ण झाली असून संपूर्ण इमारत केव्हाही कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(३) जिल्हयातील श्रीवर्धन शहर हे महत्वाचे असल्याने तसेच या बसस्थानकावरुन राज्यातील अनेक जिल्हयात होणारी बस वाहतूक व शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी गर्दी विचारात घेता नविन बसस्थानकाचे बांधकाम सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) श्रीवर्धन बसस्थानक हे सन १९८६-८७ साली बांधण्यात आले आहे. बसस्थानकाची इमारत सुस्थितीत असल्यामुळे येथे नवीन बसस्थानकाचे बांधकाम करण्याची बाब विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.